   b. There has been frequent change in the trading status of the equity shares of the Target Company. As on the date of the LOF, trading in the equity shares of the Target Company was restricted. However, as on the date of the recommendation of the IDC, trading in the equity shares was not restricted. Further, as on the last preceding day of this Advertisement, trading in the equity shares of the Target Company is once again restricted.
   c. We have inserted point no.'s 8.14 (xii) and 8.23 (iii) in the LOF. The newly inserted points are produced herein below:

   *"8.14(xii) All non-resident Public Shareholders (i.e., Public Shareholders not residing in India including NRIs, OCBs and FPIs) are mandatorily required to fill the Form of Acceptance. The non-resident Public Shareholders holding Equity Shares in dematerialised form, directly or through their respective Selling Brokers, are required to send the Form of Acceptance along with the required documents to the Registrar to the Offer at its address given on the cover page of the Letter of Offer. The envelope should be super scribed as "Kkalpana Plastick Limited - Open Offer". The detailed procedure for tendering Equity Shares will be included in the Form of Acceptance."*

   *"8.23 (iii) In case of certain client types viz. NRI, Foreign Clients etc. (where there are specific RBI and other regulatory requirements pertaining to funds pay-out) who do not opt to settle through custodians, the funds pay-out would be given to their respective Selling Broker's settlement accounts for releasing the same to their respective shareholder's account onwards. For this purpose, the client type details would be collected from the Registrar to the Offer."*
8. **Details regarding the status of the Statutory and other approvals:**

   As on the date of Letter of Offer, there are no regulatory or statutory approvals pending to be received. If any other statutory approvals become applicable prior to the completion of the Offer, this Offer would also be subject to such other statutory approval(s). For more details regarding the statutory and other approvals for this Offer, please refer to the paragraph "Statutory and other approvals" under paragraph 7.10 of LOF.
9. The Open Offer will be implemented by the Acquirer through Stock Exchange Mechanism made available by the Stock Exchange in the form of separate window (**"Acquisition Window"**) as provided under the SEBI (SAST) Regulations and SEBI Master Circular SEBI/HO/CFD/PoD-1/P/CIR/2023/31 dated February 16, 2023. BSE Limited has granted the Acquisition Window to the Acquirer through their notice no. 20260818-21 dated August 18, 2026.
10. **The schedule of major activities relating to the Offer as mentioned on page no. 2 of the DLOF stands amended and the revised schedule as mentioned on page no. 2 of the LOF is set forth below:**

| Activities | Original Date | Original Day | Revised Date | Revised Day |
|---|---|---|---|---|
| Public Announcement (PA) | July 07, 2026 | Tuesday | July 07, 2026 | Tuesday |
| Publication of Detailed Public Statement (DPS) in newspapers | July 14, 2026 | Tuesday | July 14, 2026 | Tuesday |
| Last date of Filing of the Draft Letter of Offer with the SEBI | July 21, 2026 | Tuesday | July 21, 2026 | Tuesday |
| Last date of a Competing Offer# | August 04, 2026 | Tuesday | August 04, 2026 | Tuesday |
| Identified Date* | August 13, 2026 | Thursday | August 07, 2026 | Friday |
| Date by which the Letter of Offer will be dispatched to the shareholders | August 20, 2026 | Thursday | August 14, 2026 | Friday |
| Last date by which Board of the Target Company shall give its recommendation | August 24, 2026 | Monday | August 18, 2026 | Tuesday |
| Last date for upward revision of Offer Price and/or Offer Size | August 25, 2026 | Tuesday | August 19, 2026 | Wednesday |
| Advertisement of Schedule of Activities for Open Offer, status of statutory and other approvals in newspapers and sending the same to SEBI, Stock Exchange and Target Company | August 27, 2026 | Thursday | August 20, 2026 | Thursday |
| Date of commencement of tendering period (Offer opening Date) | August 28, 2026 | Friday | August 21, 2026 | Friday |
| Date of closing of tendering period (Offer closing Date) | September 10, 2026 | Thursday | September 04, 2026 | Friday |
| Date by which communicating rejection / acceptance and payment of consideration for applications accepted | September 25, 2026 | Friday | September 21, 2026 | Monday |

*The above timelines are indicative (prepared based on timelines provided under the SEBI (SAST) Regulations and are subject to receipt of statutory/ regulatory approvals and may have to be revised accordingly. To clarify, the actions set out above may be completed prior to their corresponding dates subject to compliance with the SEBI (SAST) Regulations.*

*#There has been no competing offer as on the date of the LOF.*

**Identified Date is only for the purpose of determining the names of the shareholders as on such date to whom the Letter of Offer would be sent. All owners (registered or unregistered) of equity shares of the Target Company (except parties to Share Purchase Agreement including persons deemed to be acting in concert with such parties) are eligible to participate in the Offer any time before the Closure of the Tendering Period.*

11. The Acquirer accepts full responsibility for the information contained in this Advertisement and for the fulfilment of their obligations laid down in the SEBI (SAST) Regulations and a copy of this Advertisement shall also be available on the websites of SEBI at www.sebi.gov.in, BSE at www.bseindia.com and CSE at www.cse-india.com.
12. Capitalized terms used in this Advertisement, but not defined, shall have the same meaning assigned to them in the PA, DPS and LOF.

**ISSUED ON BEHALF OF THE ACQUIRER BY THE MANAGER TO THE OFFER:**

**VC Corporate Advisors Private Limited**
**SEBI REGN. No.:** INM000011096
**Validity of Registration:** Permanent
**CIN:** U67120WB2005PTC106051
**(Contact Person:** Ms. Urvi Belani/ Mr. Premjeet Singh)
31, Ganesh Chandra Avenue, 2nd Floor,
Suite No.- 2C, Kolkata-700 013
**Tel. No.:** (033) 22253940
**Email:** mail@vccorporate.com
**Website:** www.vccorporate.com

**Sd/-**
**Ashish Begwani**
**Acquirer**

**Date: 20.08.2026**
**Place: Kolkata**

# १९६२ पासूनचा गोरेगावचा तिढा अखेर सुटणार
## १०० हून अधिक रहिवाशांसाठी महसूलमंत्र्यांचा मोठा निर्णय

**मुंबई, दि. १९ : प्रतिनिधी**

गोरेगाव पश्चिमेतील एस. व्ही. रोड परिसरात तब्बल सहा दशकांपासून वास्तव्यास असलेल्या १०० हून अधिक रहिवाशांच्या प्रलंबित प्रश्नाला आता निर्णायक वळण मिळाले आहे. सिद्धीविनायक मंदिरासमोरील तसेच मेनन इंडस्ट्रीजजवळील रहिवासी भूखंडाला नवीन नगर भूमापन अर्थात सीटीएस क्रमांक मिळवून देण्याच्या प्रक्रियेला महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हिरवा कंदील दाखवला आहे. या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी मंत्रालयात महसूलमंत्री बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली विशेष बैठक घेण्यात आली. बैठकीला आमदार प्रकाश सुर्वे तसेच संबंधित परिसरातील नागरिक उपस्थित होते. गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या विषयावर प्रशासन आणि स्थानिक रहिवाशांची बाजू ऐकून घेण्यात आली. गोरेगाव पश्चिमेतील या भागात १९६२ पासून शंभरहून अधिक नागरिक वास्तव्यास आहेत. मात्र, संबंधित जागेच्या मालकी आणि नगर भूमापन क्रमांकाच्या प्रश्नामुळे रहिवाशांना अनेक वर्षांपासून अडचणींचा सामना करावा लागत आहे. या जागेच्या नोंदी आणि प्रत्यक्ष स्थितीचा प्रश्न बैठकीत चर्चेला आला.

मुंबई उपनगरचे जिल्हाधिकारी सौरभ राव यांनी बैठकीत प्रशासनाची भूमिका स्पष्ट केली. संबंधित जागेवर नाला असल्याने त्या जागेवरील अतिक्रमण कायदेशीररीत्या मान्य करता येणार नसल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे नवीन सीटीएस क्रमांक देताना तांत्रिक आणि कायदेशीर अडचणी असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले.

मात्र, आमदार प्रकाश सुर्वे यांनी स्थानिक रहिवाशांची बाजू ठामपणे मांडली. नाल्याच्या पुढे मोकळी जागा असून, त्या परिसरात नागरिक गेल्या अनेक वर्षांपासून वास्तव्यास असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. अनेक दशकांपासून वास्तव्य करणाऱ्या नागरिकांचा प्रश्न केवळ तांत्रिक कारणांमुळे प्रलंबित ठेवता येणार नाही, त्यांना न्याय मिळणे आवश्यक असल्याचे सुर्वे यांनी बैठकीत सांगितले. या प्रकरणात स्थानिक नागरिकांना दिलासा मिळावा यासाठी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रशासनाला सकारात्मक भूमिका घेण्याचे निर्देश दिले. संबंधित भूखंडाच्या प्रत्यक्ष स्थितीचा आणि उपलब्ध नोंदींचा सविस्तर अभ्यास करून पुढील कार्यवाही करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

तसेच मुंबई उपनगरच्या जिल्हाधिकाऱ्यांनी आमदार प्रकाश सुर्वे यांच्यासोबत तातडीने बैठक घेऊन स्थानिक नागरिकांच्या अडचणी समजून घ्याव्यात आणि नवीन सीटीएस क्रमांक उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक अधिकृत प्रस्ताव शासनाकडे सादर करावा, असे स्पष्ट निर्देश महसूलमंत्री बावनकुळे यांनी दिले आहेत.

त्यामुळे १९६२ पासून वास्तव्यास असलेल्या गोरेगाव पश्चिमेतील १०० हून अधिक रहिवाशांच्या प्रश्नाला आता प्रशासकीय पातळीवर गती मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. नवीन सीटीएस क्रमांकासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने आवश्यक प्रक्रिया सुरू करून शासनाकडे प्रस्ताव सादर करावा, असे निर्देश महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिल्याने या रहिवाशांना दीर्घकाळापासून प्रलंबित असलेल्या प्रश्नातून न्याय मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

# बेस्टचे २४ डेपो ६० वर्षांसाठी लीजवर

**मुंबई, दि. १९ : प्रतिनिधी**

मुंबईच्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा कणा असलेल्या बेस्टच्या २४ डेपोबाबत महापालिकेच्या प्रस्तावावरून राजकीय वातावरण तापण्याची शक्यता आहे. बेस्टचे २४ डेपो तब्बल ६० वर्षांच्या दीर्घ मुदतीच्या लीजवर देण्याच्या प्रस्तावाला विरोधकांनी तीव्र आक्षेप घेतला असून, शिवसेना ठाकरे गटाने या निर्णयाविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे.

या प्रस्तावामुळे बेस्टच्या ताब्यातील मौल्यवान जागा भविष्यात कायमस्वरूपी पालिकेच्या हातातून जाण्याचा धोका असल्याचा दावा शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्या आणि माजी महापौर किशोरी पेडणेकर यांनी केला आहे. लीजवर दिलेल्या जागांवर भविष्यात व्यावसायिक प्रकल्प किंवा मॉल उभे राहू शकतात, अशी भीतीही त्यांनी व्यक्त केली.

किशोरी पेडणेकर यांनी बेस्टला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी डेपोच्या जागा दीर्घ मुदतीच्या लीजवर देण्याऐवजी उत्पन्नाचे अन्य मार्ग शोधण्याची गरज असल्याचे म्हटले आहे. मुंबईतील महत्त्वाच्या जागा अशा पद्धतीने भाडेतत्त्वावर दिल्यानंतर त्या




पुन्हा पालिकेच्या ताब्यात येत नसल्याचा दावा करत त्यांनी प्रशासनाच्या धोरणावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

पूर्वी शिवसेना-भाजपची सत्ता असताना बेस्टला आर्थिक अडचणींतून बाहेर काढण्यासाठी मोठ्या प्रमाणात आर्थिक मदत करण्यात आली होती, असा दावा पेडणेकर यांनी केला. त्यावेळी बेस्टला अनुदान देऊन संस्था फायद्यात आणण्यासाठी प्रयत्न करण्यात आले होते; मात्र आता बेस्टची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी डेपोच्या जागांचा वापर करण्याचा मार्ग स्वीकारला जात असल्याची टीका त्यांनी केली.

बेस्ट कर्मचाऱ्यांच्या थकीत देणी आणि ग्रॅच्युटीचा मुद्दाही पेडणेकर यांनी उपस्थित केला. कर्मचाऱ्यांना त्यांचे हक्काचे पैसे आणि ग्रॅच्युटी मिळालीच पाहिजे, याबाबत कोणतेही दुमत नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मात्र, कर्मचाऱ्यांना देणी देण्यासाठी बेस्टच्या मौल्यवान डेपोच्या जागा लीजवर देणे हा योग्य मार्ग नसल्याचे त्यांनी म्हटले.

बेस्टला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी प्रवासी संख्या वाढवणे, उत्पन्नाचे पर्यायी स्रोत निर्माण करणे, प्रशासनिक खर्चावर नियंत्रण ठेवणे आणि सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम करणे यासारख्या उपाययोजनांवर भर देण्याची गरज असल्याचे ठाकरे गटाकडून सांगण्यात येत आहे.

दरम्यान, २४ डेपो ६० वर्षांसाठी लीजवर देण्याच्या प्रस्तावामुळे मुंबईच्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेशी संबंधित मालमत्तांच्या भवितव्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. "बेस्टच्या कर्मचाऱ्यांची देणी भागवण्यासाठी डेपोच्या जागाच लीजवर देणार का?" असा सवाल आता विरोधकांकडून उपस्थित केला जात असून, या प्रस्तावावर महापालिकेत होणाऱ्या चर्चेकडे मुंबईकरांचे लक्ष लागले आहे.

## 'पादचारी प्रथम' अभियान अंतर्गत लालबाग परिसरातील ६ अनधिकृत दुकाने, ४३ फेरीवाल्यांचे निष्कासन

**मुंबई, दि. १९ : प्रतिनिधी**

पदपथ अडथळामुक्त करुन पादचाऱ्यांसाठी सुलभ करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून 'पादचारी प्रथम' अभियान राबविण्यात येत आहे. या अंतर्गत, 'एफ दक्षिण' विभागाकडून लालबाग परिसरातील विविध मानाचे गणपती आणि आसपासच्या परिसरातील पदपथांवर अडथळा निर्माण करणाऱया ०६ अनधिकृत दुकानांसह ४३ अनधिकृत फेरीवाल्यांचे आज (दिनांक १९ ऑगस्ट २०२६) निष्कासन करण्यात आले.

माननीय उच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार, महानगरपालिका आयुक्त श्रीमती अश्विनी भिडे यांच्या मार्गदर्शनात, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) श्रीमती प्राजक्ता वर्मा-लवंगारे यांच्या नेतृत्वात पदपथांवरील अनधिकृत फेरीवाले व अतिक्रमणे तत्काळ हटवून पदपथ अडथळामुक्त करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून 'पादचारी प्रथम' (Pedestrian First) अभियान राबविण्यात येत आहे.

उपायुक्त (परिमंडळ-२) प्रशांत सपकाळे यांच्या मार्गदर्शनात, सहायक आयुक्त (एफ दक्षिण विभाग) श्रीमती वृषाली इंगुले यांच्या नेतृत्वात 'एफ दक्षिण' विभागाकडून लालबाग परिसरात कारवाई करण्यात आली. या कारवाईत लालबाग परिसरातील मानाचे गणपती व आसपासचा परिसर तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्गालगतच्या पदपथांवर अडथळा निर्माण करणारी ०६ अनधिकृत दुकाने, २४ तात्पुरते ताडपत्रीचे शेड, ०३ अनधिकृत कट्टे आणि ४३ फेरीवाल्यांवर आज निष्कासनाची कारवाई करण्यात आली. तसेच, या परिसरात स्वच्छताही करण्यात आली. यावेळी काळाचौकी पोलिसांचा बंदोबस्त तैनात होता.

दरम्यान, पादचाऱयांना मार्गक्रमण करण्यासाठी पदपथ सुलभ आणि सुरक्षित राहावेत. पदपथांवर अनधिकृत बांधकामे निर्माण करुन अथवा साहित्य ठेवून अडथळा निर्माण करू नयेत. अन्यथा, कठोर कारवाई करण्यात येईल, असे महानगरपालिका प्रशासनाकडून कळविण्यात येत आहे.

# सीओईपीच्या शुल्क रचनेत मोठा बदल; विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क परताव्याचा अधिक लाभ मिळणार

**मुंबई, दि. १९ : प्रतिनिधी**

सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठात शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शुल्क रचनेत महत्त्वपूर्ण बदल करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. विद्यार्थ्यांच्या हिताचा विचार करून 'इतर शुल्क' शैक्षणिक शुल्कामध्ये समाविष्ट करण्याची कार्यवाही करण्यात येणार असून, त्यामुळे शासनाच्या शिक्षण शुल्क परतावा योजनेचा विद्यार्थ्यांना अधिकाधिक लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठाच्या २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी जाहीर करण्यात आलेल्या शुल्क रचनेबाबत विद्यार्थ्यांकडून विविध निवेदने प्राप्त झाली होती. या निवेदनांची दखल घेत उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या निर्देशानुसार शुल्क रचनेत सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

या संदर्भात मंगळवार, दि. १८ ऑगस्ट रोजी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या दालनात अपर मुख्य सचिव श्री. रेड्डी तसेच संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत बैठक झाली. या बैठकीत विद्यापीठाने जाहीर केलेल्या शुल्क रचनेचा सविस्तर आढावा घेण्यात आला. विद्यार्थ्यांच्या मागण्या तसेच उच्च व तंत्रशिक्षणाचा लाभ सर्वसामान्य विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याची शासनाची भूमिका लक्षात घेऊन शुल्क रचनेची फेररचना करण्याचे निर्देश देण्यात आले.

शुल्क नियामक प्राधिकरणाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी सुधारित शुल्क रचना करण्याची कार्यवाही विद्यापीठ प्रशासनाकडून करण्यात येणार आहे. यामध्ये सध्या स्वतंत्रपणे आकारण्यात येणारे 'इतर शुल्क' शैक्षणिक शुल्कामध्ये समाविष्ट केले जाणार आहे. त्यामुळे शिक्षण शुल्क परतावा योजनेअंतर्गत पात्र विद्यार्थ्यांना परताव्याचा अधिक लाभ मिळण्याची शक्यता आहे.

या निर्णयाचा विशेष फायदा इतर मागासवर्गीय (OBC), विमुक्त जाती व भटक्या जमाती (VJNT), आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) तसेच सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग (SEBC) प्रवर्गातील विद्यार्थ्यांना आणि विद्यार्थिनींना होणार आहे. शुल्क रचनेतील सुधारणेमुळे शासनाच्या शिक्षण शुल्क परतावा योजनेचा लाभ अधिक प्रभावीपणे मिळण्यास मदत होणार आहे.

विद्यार्थ्यांच्या हितासाठी शुल्क रचनेत सुधारणा करण्याच्या निर्णयामुळे सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठातील पात्र विद्यार्थ्यांना आर्थिक दिलासा मिळणार असून, शिक्षणाच्या संधी अधिक सुलभ होण्यास हातभार लागणार आहे. या निर्णयासाठी विद्यापीठ प्रशासनाने राज्य शासनाचे आभार मानले आहेत.

विद्यार्थ्यांच्या हिताचा विचार करून सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठाच्या शुल्क रचनेत करण्यात आलेल्या या सुधारणेमुळे पात्र विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क परताव्याचा अधिकाधिक लाभ मिळणार असून, उच्च शिक्षणाचा आर्थिक भार कमी करण्याच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वपूर्ण मानला जात आहे.

# २०१० पासून रखडलेले भूखंड वाटप पुन्हा सुरू होणार

**मुंबई, दि. १९ : प्रतिनिधी**

हक्काच्या घरासाठी शासकीय भूखंडाच्या प्रतीक्षेत असलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्थांसाठी राज्य सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. २०१० पासून रखडलेली शासकीय जमीन वाटपाची प्रक्रिया आता नव्या आणि अधिक पारदर्शक धोरणानुसार पुन्हा सुरू होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सुधारित धोरण तयार केले असून, लिलाव पद्धतीने ३० वर्षांच्या भाडेपट्ट्यावर शासकीय भूखंड उपलब्ध करून देण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

यामुळे शासकीय कर्मचारी, पत्रकार, कलाकार, क्रीडापटू, मागासवर्गीय, दिव्यांग तसेच समाजातील विविध घटकांतील नागरिकांना सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या माध्यमातून घर मिळविण्याची संधी उपलब्ध होणार आहे. या नव्या धोरणाचे सादरीकरण मंत्रालयात महसूलमंत्री बावनकुळे यांच्या दालनात करण्यात आले.

राज्यात यापूर्वी ९ जुलै १९९९ आणि २५ मे २००७ रोजीच्या शासन निर्णयांच्या आधारे सहकारी गृहनिर्माण संस्थांना शासकीय जमिनींचे वाटप केले जात होते. मात्र, २०१० मध्ये भूखंड वाटपावरून निर्माण झालेल्या वादानंतर नवीन संस्थांना शासकीय जमीन देण्याची प्रक्रिया ठप्प झाली होती. आता न्यायालयीन प्रकरणे आणि सर्वोच्च न्यायालयाने २५ नोव्हेंबर २०२४ रोजी केलेली महत्त्वपूर्ण निरीक्षणे लक्षात घेऊन हे सुधारित धोरण तयार करण्यात आले आहे.

नव्या धोरणात सर्वात महत्त्वाचा बदल म्हणजे शासकीय जमिनींचे वाटप यापुढे जुन्या पद्धतीच्या सोडतीने न करता थेट लिलाव प्रक्रियेतून केले जाणार आहे. जिल्हाधिकाऱ्यांकडून उपलब्ध शासकीय भूखंडांची यादी तयार केली जाईल. त्यानंतर सार्वजनिक जाहिरात प्रसिद्ध करून तांत्रिक आणि वित्तीय लिफाफा पद्धतीने लिलाव प्रक्रिया राबविण्यात येईल.

मुंबई शहर आणि मुंबई उपनगरासाठी जमिनीच्या बाजारमूल्याच्या २.५ टक्के, तर राज्यातील उर्वरित भागांसाठी ५ टक्के पायाभूत किंमत निश्चित केली जाणार आहे. सर्वाधिक बोली लावणाऱ्या पात्र संस्थेची निवड करण्यात येईल. विशेष म्हणजे, यापुढे जमीन थेट मालकी हक्काने देण्याऐवजी सुरुवातीला ३० वर्षांच्या भाडेपट्ट्यावर देण्यात येणार आहे. ३० वर्षांचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर संबंधित जमीन भोगवटादार वर्ग-१ मध्ये रूपांतरित करण्यास पात्र ठरेल.

नव्या धोरणात विविध सामाजिक घटकांना प्रतिनिधित्व मिळावे यासाठी उपलब्ध भूखंडांमध्ये प्रवर्गनिहाय आरक्षणाची तरतूद करण्यात आली आहे. सर्वसाधारण प्रवर्गासाठी ४० टक्के, राज्य शासकीय कर्मचारी, स्थानिक स्वराज्य संस्था आणि महामंडळ कर्मचाऱ्यांसाठी १५ टक्के, अनुसूचित जाती-जमाती आणि भटक्या जमातींसाठी १० टक्के, साहित्यिक, कलाकार, क्रीडापटू आणि पत्रकारांसाठी १० टक्के भूखंड राखीव ठेवण्यात येणार आहेत.

याशिवाय केंद्र शासकीय कर्मचारी आणि आजी-माजी सैनिकांसाठी ५ टक्के, विद्यमान आणि माजी खासदार-आमदारांसाठी ५ टक्के, स्वातंत्र्यसैनिक आणि त्यांच्या वारसांसाठी ५ टक्के, दिव्यांग व्यक्तींच्या संस्थांसाठी ५ टक्के आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी ५ टक्के आरक्षणाची तरतूद करण्यात आली आहे.

# महाराष्ट्र जागतिक निर्यातीचे केंद्र होईल! उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा विश्वास

**मुंबई, दि. १९ : प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या मातीत पिकलेला कापूस आणि त्यापासून तयार उत्पादने आता थेट परदेशातील मॉलमध्ये झळकणार आहेत. कापूस उत्पादनापासून ते जागतिक फॅशन बाजारपेठेपर्यंतची साखळी अधिक बळकट करण्यासाठी राज्य सरकार कटिबद्ध असून, 'फार्म टू फॉरेन' संकल्पनेद्वारे महाराष्ट्र जागतिक निर्यातीचे केंद्र होईल, असा विश्वास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बुधवारी येथे व्यक्त केला.

जिओ वर्ल्ड सेंटर येथे असोचेम आयोजित 'फार्म टू फॉरेन कॉन्क्लेव्ह २०२६' या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना शिंदे यांनी पंतप्रधान



नरेंद्र मोदी यांच्या 'विकसित भारत २०४७' च्या स्वप्नाला बळ देण्यासाठी राज्य सरकार 'फाइव एफ' व्हिजनवर काम करत असल्याचे सांगितले. यामध्ये फार्म ते फायबर, फायबर ते फॅक्टरी, फॅक्टरी ते फॅशन आणि फॅशन ते फॉरेन असा प्रवास निश्चित करण्यात आला असल्याचे शिंदे यांनी सांगितले. महाराष्ट्राची 'टेक्सटाईल हब' म्हणून ओळख तसेच मुंबईला आर्थिक राजधानीचा दर्जा मिळवून देण्यात कापड गिरण्यांचा मोठा वाटा होता. याच ऐतिहासिक वारशाला पुढे नेत, नागपूरचा 'पीएम मित्रा पार्क' आणि अमरावती 'टेक्स्टाईल क्लस्टर' राज्याच्या अर्थव्यवस्थेला नवी गती देतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

महाराष्ट्राच्या पैठणी, कोल्हापुरी चप्पल यासारख्या पारंपरिक उत्पादनांच्या जागतिक विस्तारासाठी सरकार विशेष प्रयत्नशील आहे. भायखळा येथील ऐतिहासिक इंडिया युनायटेड मिलच्या जागेवर 'टेक्स्टाईल, क्राफ्ट अँड कल्चरल म्युझियम' उभारले जात आहे, जे राज्याच्या सांस्कृतिक वारशाची ओळख जगाला करून देईल, असेही शिंदे यांनी स्पष्ट केले. समृद्धी महामार्ग, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि जेएनपीए बंदरामुळे आता राज्यातील उत्पादने काही तासांत जागतिक बाजारपेठेत पोहोचू शकतील, असे सांगत एकनाथ शिंदे यांनी उद्योजकांना महाराष्ट्रात गुंतवणूक करण्याचे आवाहन केले.

# मराठी बोलला नाहीत तर रिक्षा-टॅक्सीचा बॅच जाणार; आजपासून कारवाईला सुरुवात

**मुंबई, दि. १९ : प्रतिनिधी**

महाराष्ट्रात रिक्षा आणि टॅक्सी चालविणाऱ्या चालकांसाठी आता मराठी भाषेचे व्यावहारिक ज्ञान अनिवार्य करण्यात आले आहे. मराठी बोलता येत नसलेल्या चालकांवर परिवहन विभागाकडून कारवाईचा बडगा उगारला जाणार असून, या नियमाची अंमलबजावणी २० ऑगस्टपासून सुरू होणार आहे. मात्र, चालकांचा रोजगार हिरावून घेणे हा सरकारचा उद्देश नसल्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी स्पष्ट केले आहे.

मराठीचे व्यावहारिक ज्ञान नसलेल्या रिक्षा-टॅक्सी चालकांना सुरुवातीला एक महिन्याची मुदत देण्यात येणार आहे. या कालावधीत मराठीचे आवश्यक ज्ञान आत्मसात न केल्यास संबंधित चालकाचा बॅज तीन महिन्यांपर्यंत निलंबित केला जाऊ शकतो. त्यानंतरही मराठी शिकण्यास जाणीवपूर्वक नकार दिल्यास बॅज आणि परवाना रद्द करण्याची कारवाई केली जाईल, अशी माहिती मंत्री सरनाईक यांनी पत्रकार परिषदेत दिली.

राज्यात रिक्षा आणि टॅक्सी चालविण्यासाठी व्यावहारिक मराठीचे ज्ञान आवश्यक असल्याचा नियम १९८९ पासून अस्तित्वात आहे. १२ ऑगस्ट २०२६ रोजी करण्यात आलेल्या संबंधित कायदेशीर तरतुदीनंतर या नियमाची आता काटेकोर अंमलबजावणी केली जाणार असल्याचे सरनाईक यांनी सांगितले.

दरम्यान, रिक्षा-टॅक्सी चालकांमध्ये मराठी भाषेचे ज्ञान वाढावे यासाठी कोकण मराठी साहित्य परिषद आणि मुंबई मराठी साहित्य



संघाच्या माध्यमातून गेल्या १०५ दिवसांपासून 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे मराठी भाषा अभियान' राबविण्यात आले. या अभियानाला सुमारे १ लाख ६५ हजार ६०० अमराठी रिक्षा-टॅक्सी चालकांनी प्रतिसाद देत मराठीचे प्रशिक्षण घेतले.

ठाण्यातील गडकरी रंगायतन येथे पद्मश्री ज्येष्ठ साहित्यिक मधु मंगेश कर्णिक यांच्या उपस्थितीत तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मंत्री उदय सामंत यांच्या उपस्थितीत या अभियानात सहभागी चालकांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. या सर्व चालकांचे परिवहन मंत्री म्हणून सरनाईक यांनी अभिनंदन केले.

महाराष्ट्रात देशाच्या विविध भागांतून आलेल्या नागरिकांना रोजगार मिळावा, ही शासनाची भूमिका असल्याचे सरनाईक यांनी स्पष्ट केले. मुंबईने नेहमीच देशभरातून आलेल्या नागरिकांना सामावून घेतले आहे. मात्र, महाराष्ट्राची भाषा आणि संस्कृती यांचा सन्मान राखणेही आवश्यक आहे. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर तिचा प्रचार, प्रसार आणि संवर्धन करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

मराठी शिकणार नाही किंवा बोलणार नाही, अशी भूमिका घेणाऱ्या चालकांविरोधात कायद्याच्या चौकटीत कारवाई करणे हे परिवहन विभागाचे कर्तव्य असल्याचेही सरनाईक म्हणाले. अशा चालकांना यापुढे कोणतीही अतिरिक्त मुदत न देता नियमानुसार कारवाई केली जाईल, असा इशाराही त्यांनी दिला.

यापुढे नवीन रिक्षा-टॅक्सी परवाना किंवा बॅज देताना मराठी भाषेच्या ज्ञानाची प्रत्यक्ष तपासणी केली जाणार आहे. आरटीओ अधिकारी चालकासोबत संवाद साधून त्याला व्यावहारिक मराठीचे ज्ञान आहे की नाही, हे तपासतील. या तपासणीचे व्हिडिओ रेकॉर्डिंगही करण्यात येणार असून, चालकाला मराठीचे आवश्यक ज्ञान असल्याचे स्पष्ट झाल्यानंतरच नवीन बॅज देण्यात येईल.

राज्यात आतापर्यंत सुमारे ९ लाख ६५ हजार रिक्षा-टॅक्सी परवाने आणि बॅज देण्यात आले आहेत. या पार्श्वभूमीवर विद्यमान चालकांबरोबरच नवीन परवाने घेणाऱ्या चालकांचीही मराठी भाषेच्या निकषावर तपासणी होणार आहे.

रिक्षा-टॅक्सी परवाना किंवा बॅज मिळवण्यासाठी बनावट अधिवास प्रमाणपत्रांचा वापर होत असल्याच्या तक्रारीही परिवहन विभागाला प्राप्त झाल्या आहेत. त्यामुळे अशा प्रमाणपत्रांची सखोल तपासणी करण्याच्या सूचना आरटीओ अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. संबंधित व्यक्ती महाराष्ट्रात प्रत्यक्षात १५ वर्षांपासून वास्तव्यास आहे का, याची आवश्यकतेनुसार प्रत्यक्ष पडताळणी तसेच पोलिसांच्या माध्यमातून चौकशी करूनच पुढील कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

या संपूर्ण मोहिमेची जबाबदारी अतिरिक्त परिवहन आयुक्त रवी गायकवाड यांच्याकडे सोपविण्यात आली असून, पुढील महिन्याच्या अखेरीस मोहिमेचा सविस्तर अहवाल सादर केला जाणार आहे. दरम्यान, रिक्षा-टॅक्सी चालकांच्या कल्याणासाठी स्थापन करण्यात आलेल्या आनंद दिघे यांच्या नावाच्या महामंडळाचे ३७ हजारांहून अधिक सदस्य झाले असून, विविध कल्याणकारी योजनांसाठी सुमारे ५७ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांसाठीच्या योजना, वयाच्या ६५ वर्षांनंतर रिक्षा चालकांना मिळणारे १० हजार रुपयांचे अनुदान तसेच गंभीर आजार आणि उपचारांसाठी आर्थिक मदत अशा विविध योजनांचा लाभ चालकांना दिला जात असल्याची माहिती सरनाईक यांनी दिली.


## विक्रान इंजिनिअरिंग लिमिटेड

CIN : L93000MH2008PLC272209
नोंदणीकृत कार्यालय: बी२–बी३, आशेर आयटी पार्क, रोड नं. १६/झेड, वागळे इंडस्ट्रियल इस्टेट, ठाणे पश्चिम, ठाणे, महाराष्ट्र, ४००६०४
**E-mail:** info@vikrangroup.com; **Website :** www.vikrangroup.com

**१८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची आणि ई–मतदानाची सूचना, नोंदणीची तारीख आणि अंतिम लाभांशाची माहिती**

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, विक्रान इंजिनिअरिंग लिमिटेड (कंपनी) ची १८ वी (अठरावी) वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम) व्हिडिओ कॉन्फरन्सिंग (व्हीसी) / इतर दृकश्राव्य माध्यमांद्वारे (ओएव्हीएम) शुक्रवार, ११ सप्टेंबर, २०२६ रोजी सकाळी ११:00 वाजता (आयएसटी) आयोजित केली जाईल. दिनांक ११ ऑगस्ट, २०२६ रोजीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेत नमूद केलेला व्यवसाय पार पाडण्यासाठी, कंपनी कायदा, २०१३ (कायदा), प्रतिभूती आणि विनिमय मंडळ (सूचीबद्धता दायित्वे आणि प्रकटीकरण आवश्यकता) विनियम, २०१५ (सेबी सूचीकरण विनियम), आणि कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय (एमसीए) आणि प्रतिभूती आणि विनिमय मंडळ (सेबी) यांनी या संदर्भात जारी केलेल्या सर्व लागू परिपत्रकांच्या अनुपालनात.

उपरोक्तनुसार, १८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना, आर्थिक वर्ष २०२५–२६ च्या वार्षिक अहवालासह, १९ ऑगस्ट २०२६ रोजी, कंपनी, तिचे डिपॉझिटरी पार्टिसिपंट्स, किंवा रजिस्ट्रार आणि शेअर ट्रान्सफर एजंट (आरटीए) यांच्याकडे, १४ ऑगस्ट २०२६ च्या रेकॉर्ड डेटनुसार, ज्यांचे ई–मेल आयडी नोंदणीकृत होते, अशा सर्व भागधारकांना ई–मेलद्वारे इलेक्ट्रॉनिक पद्धतीने पाठवण्यात आली. दोन्ही कागदपत्रे कंपनीच्या www.vikrangroup.com या वेबसाइटवर, बीएसई आणि एनएसई च्या अनुक्रमे www.bseindia.com आणि www.nseindia.com या वेबसाइटवर, आणि एनएसडीएल च्या www.evoting.nsdl.com या ई–व्होटिंग वेबसाइटवर देखील उपलब्ध आहेत.

ज्या भागधारकांनी आपला ई–मेल पत्ता नोंदवलेला नाही, त्यांना वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना आणि वार्षिक अहवाल पाहण्यासाठी वेब–लिंक आणि क्यूआर कोड असलेले एक पत्र पाठवले जात आहे.

सूचना पाठवल्यानंतर कंपनीचे सदस्य झालेली आणि अंतिम तारखेपर्यंत शेअर्स धारण करणारी कोणतीही व्यक्ती companysecretary@vikrangroup.com वर लिहून लॉगिन आयडी आणि पासवर्ड मिळवू शकते. दूरस्थ ई–मतदानासाठी एनएसडीएल कडे आधीच नोंदणी केलेले सदस्य त्यांचा विद्यमान युझर आयडी आणि पासवर्ड वापरू शकतात.

कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १०८ अन्वये, कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम, २०१४ च्या नियम २० सहित, आणि सेबी लिस्टिंग नियमावलीच्या नियम ४४ अन्वये, कंपनी १८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत प्रस्तावित सर्व ठरावांवर सदस्यांना इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे मतदान करण्याची सुविधा देत आहे. भौतिक किंवा डिमटेरिअलाईज्ड स्वरूपात शेअर्स धारण करणारे सदस्य एनएसडीएल च्या www.evoting.nsdl.com येथील दूरस्थ ई–मतदान प्रणालीद्वारे आपले मत देऊ शकतात. केवळ तेच सदस्य मतदानास पात्र आहेत, ज्यांची नावे शुक्रवार, ४ सप्टेंबर, २०२६ या अंतिम तारखेपर्यंत सदस्य नोंदवहीमध्ये, किंवा डिपॉझिटरीजद्वारे सांभाळल्या जाणाऱ्या लाभधारक मालकांच्या नोंदवहीमध्ये समाविष्ट आहेत.

सदस्यांसाठी महत्त्वाची माहिती

| | |
|---|---|
| मतदानाच्या हक्कासाठी अंतिम मुदत | शुक्रवार, ४ सप्टेंबर, २०२६ |
| दूरस्थ ई–मतदान कालावधी: | सोमवार, ७ सप्टेंबर, २०२६ रोजी सकाळी ९:00 वाजता (आयएसटी) सुरू होईल आणि गुरुवार, १० सप्टेंबर, २०२६ रोजी सायंकाळी ५:00 वाजता (आयएसटी) समाप्त होईल. |

- त्यानंतर ई–मतदान प्रणाली बंद केली जाईल आणि एकदा दिलेली मते बदलता येणार नाहीत.
- ज्या सदस्यांनी दूरस्थ ई–मतदानाद्वारे आपले मत दिलेले नाही, ते वार्षिक सर्वसाधारण सभेदरम्यान उपलब्ध असलेल्या ई–मतदान प्रणालीद्वारे मतदान करू शकतात. ज्या सदस्यांनी यापूर्वीच दूरस्थपणे मतदान केले आहे, ते वार्षिक सर्वसाधारण सभेला उपस्थित राहू शकतात, परंतु सभेत पुन्हा मतदान करू शकणार नाहीत.
- डिमटेरिअलाईज्ड स्वरूपात, भौतिक स्वरूपात धारण केलेल्या शेअर्ससाठी, आणि ज्या सदस्यांनी आपला ई–मेल पत्ता नोंदवलेला नाही, त्यांच्यासाठी दूरस्थ ई–मतदान आणि व्हिडिओ कॉन्फरन्सिंग/ओएव्हीएम द्वारे वार्षिक सर्वसाधारण सभेत ई–मतदान/उपस्थित राहण्याकरिता सविस्तर सूचना वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेत दिलेल्या आहेत.
- संचालक मंडळाने, ई–मतदान प्रक्रियेवर निष्पक्ष आणि पारदर्शकपणे देखरेख ठेवण्यासाठी, सुश्री गीता कानाबार (FCS 8702; CP 8330), प्रॅक्टिसिंग कंपनी सेक्रेटरी आणि पार्टनर, मे. गीता कानाबार अँड असोसिएट्स, यांची छाननीकर्ता म्हणून नियुक्ती केली आहे.

दूरस्थ ई–मतदानाचा निकाल, छाननी अहवालासह, वार्षिक सर्वसाधारण सभेच्या समाप्तीनंतर विहित कालावधीत जाहीर केला जाईल. आणि वर नमूद केल्याप्रमाणे, कंपनीच्या वेबसाइटवर, बीएसई आणि एनएसई च्या वेबसाइटवर, आणि एनएसडीएलच्या www.evoting.nsdl.com या ई–मतदान वेबसाइटवर प्रकाशित केला जाईल.

सदस्यांना पुढे कळविण्यात येते की, संचालक मंडळाने, २२ मे २०२६ रोजी झालेल्या आपल्या सभेत, आर्थिक वर्ष २०२५–२६ साठी प्रति इक्विटी शेअर ०.१८ चा अंतिम लाभांश देण्याची शिफारस केली आहे. अंतिम लाभांशासाठी भागधारकांची पात्रता निश्चित करण्याची रेकॉर्ड तारीख शुक्रवार, २८ ऑगस्ट, २०२६ आहे.

ई–मतदान प्रक्रियेसंबंधी प्रश्नांसाठी, सदस्य एनएसडीएल वेबसाइटवरील एफएक्यू आणि ई–मतदान वापरकर्ता मॅन्युअल पाहू शकतात, evoting@nsdl.com वर लिहू शकतात, किंवा ०२२–४८८६ ७००० या टोल–फ्री क्रमांकावर कॉल करू शकतात.

विक्रान इंजिनिअरिंग लिमिटेडसाठी
सही/–
राकेश अशोक मार्खेंडकर
अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक
DIN: 07009284

दिनांक: २० ऑगस्ट २०२६
ठिकाण: ठाणे